# जनलक्ष्मी को-ऑप. बँक लि., नाशिक (शेडयुल्ड बँक)

केंद्र कार्यालय : "समृध्दी", गडकरी चौक, जुना आग्रारोड, नाशिक-४२२००२.
☎ ०२५३-२५७७८७२ / ७३
Email : info@janalaxmibank.in Website : www. janalaxmibank.in

जा.क्र. : एचओ/वार्षिक सभा/३५८/२०२५-२०२६ दिनांक : १६/०८/२०२५

## ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त भागधारक सभासदांसाठीच)**

**मान्यवर सन्माननीय सभासद बंधू व भगिनींना,** कळविण्यात येते की, **बँकेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ३१/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता परशुराम सायखेडकर नाटयगृह, नाशिक** या ठिकाणी बँकेचे **अध्यक्ष, मा.श्री भालचंद्र माधवराव पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणेसाठी सभा बोलविण्यात येत आहे. तरी कृपया सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**-:- सभेपुढील विषय -:-**

१) दिनांक ०८/०९/२०२४ रोजी झालेल्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि.३१/०३/२०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल,ताळेबंद,नफा तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल वाचून त्याची नोंद घेणे.
४) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने वैधानिक लेखा परिक्षकाच्या नेमणुकीसंदर्भात रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेणे.
५) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी समावर्ती लेखापरिक्षकाची नियुक्ती करुन मेहनताना ठरविणेबाबत विचार करणे.
६) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार करुन मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मंजूरी देणे.
७) मा.वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली थकीत कर्जे बँकेचे वसुलीचे अधिकार अबाधीत ठेऊन निर्लिखीत करणे.
८) बँकेने निश्चित केलेल्या तडजोड व समझोता कर्ज परतफेड योजने अंतर्गत २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेणे व त्यास मान्यता देणे.
९) संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना दिलेल्या कर्जाचे विवरण वाचून नोंद घेणे.
१०) ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या मा.सभासदांना रजा मंजूर करणे.
११) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयाचा विचार करणे.

स्थळ: नाशिक
दिनांक : १६/०८/२०२५

संचालक मंडळाचे आदेशावरुन
**भूषण त्रंबक रानडे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

**विशेष सुचना :-**

१. कोरमअभावी सभा अर्धा तास तहकुब ठेवून त्यानंतर सभेचे कामकाज त्याच ठिकाणी सुरु होईल व पूर्ण केले जाईल.
२. ज्या सभासदांना सभेत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते दि. २५/०८/२०२५ पर्यंत बँकेत लेखी कळवावे.
३. सन २०२४-२०२५ चे आर्थिक पत्रके व लेखापरिक्षण अहवाल अवलोकनासाठी सर्व सभासदांना बँकेच्या मुख्य कार्यालयात बघावयास मिळतील.
४. ज्या सभासदांनी केवायसी निकषाची पूर्तता केली नसेल त्यांनी त्वरीत बँकेशी संपर्क करुन पूर्तता करावी
५. बँकेचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल कार्यालयीन वेळेत बँकेच्या केंद्र कार्यालय व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.